

# मायबोली मेळावा वृत्तपत्र


**वर्ष :** सातवे; **वृत्त:** दुसरे एप्रिल २०१५

*newsletter@mmtbusa.org*



**अध्यक्ष**
*श्री. पराग पितळे*
**उपाध्यक्ष**
*डॉ. श्री. प्रसाद कुलकर्णी*
**सचिव**
*श्री. संदीप रणदिवे*
**उपसचिव**
*सौ. अस्मिता शेंडे*
**सांस्कृतिक सचिव**
*श्री. समीर तांदळेकर*
**सांस्कृतिक उपसाचिव**
*सौ रीना खानविलकर*
**खजीनदार**
*श्री. आशिष कुलकर्णी*
**भोजनव्यवस्था सचिव**
*श्री.वीरेन देशपांडे*
**भोजनव्यवस्था उपसाचिव**
*श्री. साकेत भंडारे*

---

**वृत्तपत्र संस्थापक**
*सौ. मंजुषा नाईक*
**संपादक**
*तेजल कोळवणकर*
**सहसंपादक**
*सौ. राजश्री लिमये*
**सहाय्य**
*सौ. मेधा फडणीस*


नमस्कार मंडळी ! गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा ! गुढीपाडवा म्हणजे हिंदू नवीन वर्षाचा पहिला दिवस. हा दिवस पर्शियन संस्कृतीतही 'नवरोज' या नावाने नवीन वर्षाचा पहिला दिवस म्हणून साजरा होतो. साडेतीन शुभ मुहुर्तांतील पहिला मुहूर्त म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेचा हा दिवस.

या दिवशी श्रीरामचंद्र, रावणाचा वध करून अयोध्येत परतले. अयोध्यावासियांनी अंगणात विजयपताका म्हणजेच गुढ्या उभारून श्रीरामांचे स्वागत केले आणि तेव्हा पासून हि गुढी उभारायची प्रथा चालू झाली. उंच बांबूच्या टोकाला रंगीत वस्त्र, कडूनिंबाची पाने, झेंडूची फुले आणि साखरेच्या गाठीची माळ लावून वर कुंकवाने सजवलेला कलश चढवून गुढी सजविली जाते. आजच्या आधुनिक काळात, अंगणात जरी नाही, तरी खिडकीत किंवा देव्हा-यात गुढीची पूजा करून ही परंपरा आजही आपण आवडीने व आस्थेने जपली आहे.

आपले हे सणवार साजरे करण्यात व प्रथा पाळण्यात सुद्धा एक वेगळाच आनंद असतो. मित्रमंडळींबरोबर एकत्र जमून सण साजरा करायला मिळणे म्हणजे तर दुग्धशर्करा योगच ! तर मग भेटूया आपल्या मायबोली मेळावाच्या गुढीपाडव्याच्या कार्यक्रमात.

# आढावा

मकरसंक्रांतीच्या सोहळ्यानंतर MMTB ने आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांचा हा थोडक्यात आढावा..

उबदार थंडीचे वातावरण असताना मार्च महिन्यात होणा-या रंगपंचमीच्या कार्यक्रमाची उत्सुकता सर्वांनाच असते. ह्या दिवसाची द्विगुणित होते ते Sports Day Event मुळे !

'Lettuce Lake Park, Tampa' या ठिकाणी ७ मार्च roji 'रंगोत्सव' आणि 'Sports Day Event' साजरा झाला. सर्वच वयोगटातील लोकांचा उत्साह, जोडीला हवामानाची साथ आणि कार्यकारिणी समितीचे उचित आयोजन या सर्वांमुळे कार्यक्रम उत्तम रितीने पार पडला. कार्यक्रमात मायबोली परिवारातील बाहेरगावी असणारे कॉलेज students ही शिक्षणाच्या निमित्ताने बाहेर शिकायला राहणारी college वर्गीय मुलेही spring break च्या निमित्ताने या कार्यक्रमात सामील होऊ शकle. त्याचबरोबर नवीन सदस्यांची उपस्थिती आणि उत्साही सहभाग यामुळे ख-या अर्थाने कार्यक्रमाची रंगत वाढली.

MMTB आयोजित विविध स्वयंसेवी उपक्रम:

१: ९ फेब्रुवारी २०१५, James A. Haley Veterans Hospital, Tampa येथे MMTB च्या स्वयंसेवकांनी Bingo night आणि अल्पोपहारासाठी अर्थसाहाय्य केले.

२: २१ मार्च २०१५, Sweetwater Organic Farm, Tampa येथे organic food ची शेती कशी होते, त्यासाठी विशेष प्रयत्न कसे घेतले जातात याचे प्रात्यक्षिक मिळवण्याची अनोखी संधी सर्व स्वयंसेवकांना मिळाली.

MMTB ने पुन्हा एकदा BMM च्या मदतीने वैशिष्ट्यपूर्ण मराठी व्यक्तिमत्त्वांवर आधारित चित्रपट Tampa वासियांसाठी आयोजित केला. २१ फेब्रुवारी २०१५ या दिवशी 'लोकमान्य एक युगपुरुष' हा चित्रपट Tampa Pitcher Show येथे प्रदर्शित केला गेला. यावेळीही परिवारातील लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून चित्रपटाला आणि commitee च्या प्रयत्नांना दाद दिली. या वेळेस मा. लोकमान्य टिळकांचे सहकारी स्वातंत्र्यसैनिक श्री. करंदीकर यांचे नातू श्री. वामन करंदीकर यांची उपस्थिती हे वैशिष्ट्य ठरले. लोकमान्य आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांच्या दुर्मिळ अशा छायाचित्रप्रती त्यांनी अभिमानाने MMTB परिवाराला देऊ केल्या. Newsletter च्या माध्यमातून त्यासर्वांपर्यंत पोहोचविताना आनंद होत आहे.

(छायाचित्रे : पृष्ठ ६ वर)

# उद्योजक

गेल्या २० वर्षापासून Tampa येथे वास्तव्य असलेल्या सौ. कविता तायवाडे, एक अतिशय हसरे, प्रेमळ आणि उत्साही व्यक्तिमत्व म्हणून आपल्या सर्वांच्या परिचयाच्या आहेतच. कविता व्यवसायाने 'Beautician' असून गेल्या आठ वर्षांपासून त्या स्वतःचे Beauty Parlor घरच्या set up मधे चालवतात. त्यांच्या व्यवसायाची ओळख आणि वाटचाल त्यांच्याच शब्दात.

“मला लहानपणापासूनच मेक अप, केशभूषा, नवनवीन beauty products व services ची माहिती वाचणे ह्याची खूप आवड होती. मात्र लग्नानंतर माझी ही आवड लक्षात येताच माझे पती श्री. अतुल तायवाडे यांनी माझ्या आवडीला योग्य दिशा देऊन Tampa मधे Aesthetician चा course करण्यासाठी मला प्रोत्साहन दिले. मी Aesthetician चा एक वर्षाचा आणि पुढे ६ महिन्यांचा नेल स्पेशलिस्ट चा course पूर्ण करून, Beautician म्हणून आपल्या व्यवसायिक जीवनाला सुरुवात केली.

विविध प्रकारचे Facials, Manicure, Pedicure, Threading, Hair style, Waxing, मेकअप, मेहंदी, नेल आर्ट अशा services माझ्या parlor मधे उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे लग्नात वधूंचा मेक अप करण्याचा अनुभवही माझ्याकडे आहे.



दोन लहान मुलांची आणि घराची जबाबदारी सांभाळत पुन्हा नव्याने professional course करणे हा माझ्यासाठी खरच धाडसी निर्णय होता. मात्र स्वतःची आवड व्यवसायात बदलून आज मी माझी जी ओळख निर्माण केली आहे त्याचा मला नक्कीच आनंद व अभिमान वाटतो. मिळणा-या आर्थिक उत्पन्ना बरोबरच clients च्या चेह-यावरील आनंद व समाधान हीच माझ्यासाठी खरी पोचपावती आहे.”

Contact: कविता तायवाडे: ८१३-७६७-०५८१



# ACHIEVEMENTS



**Gabriel Daniels**, son of Michael and Shama Daniels and **Narayan Kulkarni** son of Dr. Prasad and Vidya Kulkarni, were awarded the University of Florida Presidential Service Award last month for the years 2014 – 15.

The Presidential Service Award is intended to recognize students who have dedicated their time and efforts while at the University of Florida for promoting social justice, community awareness, and civic engagement on campus and in the community. The presidential service award is a chance to acknowledge those students who have made outstanding efforts towards community service and too often go unrecognized and unrewarded for their selfless labor. On 31st March 2015, this award was given to University of Florida (undergraduate & graduate) students who complete at least 100 service hours and wrote a purposeful reflection on their experience.

Narayan won this award because of his volunteering in the emergency department at the James A. Haley VA. This volunteering experience has affirmed his desire to pursue medicine as his further career. These are some of Narayan's statements in his purposeful reflection. "Serving at the VA as an Emergency Department Volunteer was an insightful experience" … "The role I played was important as it freed time for nurses in order to concentrate on the humanistic quality of their care and to work with more patients."

Gabriel has been an active volunteer throughout his undergraduate career at the University of Florida. He has volunteered weekly alongside children with disabilities through Noah's endeavour and the Sidney Lanier fitness program. He gained valuable patient care experiences through the Equal Access Clinic Network and UF Health Shands Hospital, and has explored his passions through Arts in Medicine and other creative outlets. Gabriel plans to continue his work with these and other programs as he enters medical school in the upcoming fall semester.

MMTB family is proud of you and wish both of you a very bright career!



**Aditya Taiwade is** son of Atul and Kavita Taiwade. He and **his team** won the judges choice award in 1st Lego league state tournament that took place at Orlando on 8th March 2015. Among 700 participating schools in Florida, 48 schools reached the finals. We are proud to have Aditya reaching for the state level, consistently for 3 years.

**Amruta Potdar,** daughter of Sanjiv and Yamini Potdar**,** is currently a sophomore in the IB program at Strawberry Crest High School. While maintaining her straight A's in school and being an I.B. Ambassador Amruta has been keeping herself busy in lot of other activities.



Amruta is an awesome dancer and choreographer. She choreographed a dance fusion and her team of 10 dancers won the talent show in her school earlier this month. Amruta is a team captain for the Relay for Life Cancer Event hosted in Plant City High School. Amruta started a Dance Marathon Club and the event was very successful just in its first year with 90 students participating. The club raised over $4,200 raised for the All Children's Hospital in St. Petersburg. Amruta is a drum major in marching band and conducts the band during football games, shows and music competitions. We are very proud of Amruta and wish her all the best!





# दुर्मिळ छायाचित्रे

**सेनापती बापट आणि करंदीकर**



**सावरकर आणि करंदीकर**




**टिळक आणि करंदीकर**

